फोन : २५१५ ०१०१
मो. : ९८६९५६६१३७

# ईशान्य मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटी (आय)

घाटकोपर तालुका ब्लॉक नं. ७८

**अध्यक्ष : श्री. गजानन दौलत पवार** S.E.O.

कार्यालय : २७३/७४, डॉ. दामजी कंपाऊंड, रायगड चौक, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०० ०७७.

**ॲड. श्री. गुरुदास कामत**
(खासदार)
अध्यक्ष : मुंबई विभागीय काँग्रेस कमिटी (आय)

**श्री. वेल्लुस्वामी नायडु**
(नगरसेवक)
अ... : ईशान्य मु. जि. कॉं. कमिटी (आय)

अ. क्र. :

दिनांक :

प्रति,

मा. आर. ए. राजीव, आय. ए. एस
अति. आयुक्त [ शहर ]
बृहन्मुंबई महानगर पालिका,
मुंबई-४०० ००१.

विषय : विद्याविहार [पश्चिम], किरोळ गांव, खलई गांव रोड, मुंबई-८६ येथील अस्वच्छता व ईतर अवैध बाबींबाबत तक्रार.

महोदय,

सी.टी.एस. नं. २३२ [ हिस्सा ] आणि सी.टी.एस. नं. २३५, किरोळ गांव, खलई गांव रस्ता विद्याविहार [प] येथे मे. राजबिल्डटेक प्रा. लि. यांनी ७ मजली व्यापारी संकुल बांधले असुन त्यात दुकानदार व्यवसाय करत आहेत. सदर विकासकांनी त्यांच्या जमिनीबाहेर पदपथावर म्हाडाच्या खर्चाने व बांधलेले शौचालय अवैध रितीने तोडुन टाकल्यामुळे आजुबाजुच्या झोपडपट्टीतील रहिवाशी व स्टेशनपरून जा - ये करणारे पादचारी हे रस्त्यावरच नैसर्गीक विधी करू लागल्यामुळे येथे खुप घाण झालेली आहे, माहिती अधिकाराचा वापर करुन केलेल्या तक्रारींना देखील एन विभाग व ईमारत प्रस्ताव विभागाने दाद न दिल्यामुळे तसेच सदर विकासकावर अजुनही पोलीसात तक्रार दाखल करुन गुन्हा दाखल न केल्यामुळे या प्रकरणी कोणतीच कारवाई न होता परिसर अस्वच्छ होत आहे, येथे पालिकेची एक चौकी असुन तेथील कर्मचारी देखील या शौचालयाचा वापर करत होते, त्यांना देखील या विकासकाने गप्प केल्यामुळे चांगले शौचालय डोळ्यासमोर तोडले जात असतांना देखील त्यांना बघ्याची भुमीका



निवास : १८४/५०१४, रेलव्ह्यू को. ऑप. सोसायटी, जवाहर रोड, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०० ०७५.

घेणे भाग पडले असे समजते.

या विकासकाने मुळात ४ मजले बांधण्याची परवानगी असतांना देखील ७ मजली व्यापारी संकुल उभे केल्याचे समजते, जेंव्हा मुंबई उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामांची यादी सादर करण्याचे आदेश दिले तेंव्हा हे वर नमुद केलेले व्यापारी संकुल बांधुन झालेले असतांना देखील ईमारत प्रस्ताव विभागाच्या घाटकोपर विभागाने दिलेल्या यादी मध्ये हे नांव समाविष्ठ केले नाही, असे समजते . अशा प्रकारे अनधिकृत बांधकामांच्या यादी मध्ये अनेक नांवे समाविष्ठ न करण्याची प्रकरणे घाटकोपर व बांद्रा विभागामध्ये जास्त प्रमाणांत झालेली आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळते. या विभागाचे प्रमुख संचालक अभी-यांत्रीकी हे असुन ही त्यांचीच जबाबदारी होती जी त्यांनी पार पाडली नसल्याचे समजते. त्यांच्याच संमतीने व आदेशाने घाटकोपर , भायखळा, व बांद्रा विभागांनी अनेक अनधिकृत बांधकामेअनधिकृत बांधकामाच या सुची मध्ये समाविष्ठ करण्याचे टाळले असे समजते. यास्तव कोर्टाचा अवमान व पालिकेची दिशाभुल करुन ज्या अनधिकृत बांधकामांना चौधरी महोदय व त्यांच्या हाताखालच्या अधिका-यांनी संरक्षण दिले [ अनधिकृत बांधकामांच्या सुची मध्ये नांवे समाविष्ठ न करुन ] त्यांची चौकशी ते निवृत्त होण्या अगोदरच करुन त्यांना तसेच अशी कामे करणा-या विकासकांना व त्यांनी नियुक्त केलेल्या वास्तुविशारदांना योग्य ते शासन करावे ही विनंती.

जुलै महिन्यामध्ये मे. राजबिल्डटेक प्रा. लि. यांनी याच सात मजली व्यापारी संकुलानजीक पुर्वीच्या सिमेंट ठेवण्यासाठी वापरात येणा-या गोदामा मध्ये बांधलेली ७ दुकाने ईमारत प्रस्ताव विभागाने तोडली तेंव्हा त्यांना ४ मजल्यावरचे अनधिकृत तीन मजले तोडणे सहज शक्य होते, कारण तेंव्हा त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ व पोलीस दल उपलब्ध होते, परंतु त्यांनी

हे मोठे अनधिकृत व्यापारी बांधकाम तोडले नाही, आज तोडलेली ६ दुकाने परत बांधण्याचे काम चालु असुन यांच्याकडे देखील इमारत प्रस्ताव विभाग जाणिवपुर्वक दुर्लक्ष करत आहे असे समजते.

आपण यास्तव या प्रकरणाची सखोल व सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश देऊन सदर विकासकास परत त्याच जागी त्याने तोडलेले शौचालय परत बांधुन देण्याचे आदेश द्यावेत व त्याची अवैध बांधकामे निष्कासीत करावीत ही विनंती.

कळावे,

आपला नम्र,

[ गजानन दौलत पवार ]

प्रत माहितीसाठी सादर

१] मा. आयुक्त ,महानगरपालिका, मुंबई
२] अ. आ. प. अ.
३] मा. मुख्यमंत्री,
४] मा. उपमुख्य मंत्री,
५] मा. सचिव , नगर विकास विभाग
६] श्री. सामाणी साहेब
७] श्री. हेमंत करकरे, आ.पी.एस.